# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबई शहराच्या सागरी सुरक्षेसाठी लष्करासारख्या संरक्षक तुकड्या तयार करण्याबाबत

**(१) ५३३३ (०८-३-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) दहशतवादी संघटनांच्या सतत हिटलिस्ट वर असलेल्या मुंबई शहराच्या सागरी सुरक्षेसाठी लष्करासारख्या संरक्षक तुकड्या तयार करण्यात याव्यात अशी शिफारस मुंबई पोलिसांतर्फे शासनास करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शसनाने याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिवसेना प्रमुख आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याबाबत

**(२) ६५५३ (०७-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवसेना प्रमुख आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्यासाठी मुंबई शहरात जागा पहाणी करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने उच्चस्तरीय समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीमध्ये कोणकोणाचा समावेश आहे व आतापर्यंत समितीने किती व कोणत्या ठिकाणच्या जागांची पाहणी केली आहे व जागा निश्चित करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१५) :** (१) होय.
(२) सदर समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव आणि सदस्य म्हणून अपर मुख्य सचिव (र.व.का.), सामान्य प्रशासन विभाग, प्रधान सचिव (नवि.-१) नगर विकास विभाग, प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, विभागीय आयुक्त, कोकण विभाग, पोलीस आयुक्त, मुंबई आणि सदस्य सचिव म्हणून उप सचिव (कार्यासन-२९), सामान्य प्रशासन विभाग यांचा समावेश स्मारक उभारण्याच्या अनुषंगाने खालील जागांची पाहणी केली आहे.

१) महापौर बंगल्याच्या उत्तरेकडील भूकर क्रमांक ५०२ पार्क क्लब, दादर
२) महापौर बंगल्याच्या दक्षिणेकडे असणारा म्युनिसिपल जिमखाना भूकर क्रमांक १/४९७ दादर
३) बाम्बे डाईंग कंपनी, भूकर क्रमांक २२३, १/२२८, दादर नायगाव डिव्हीजन
४) टेक्सटाईल म्युझीयमकरिता माझगाव येथील आरक्षित भूकर क्रमांक ८३१
५) सॉल्टपॅन, भूकर क्रमांक ६
६) लोअर परेल येथील भूकर क्रमांक ६५ शक्ती मिल्स लिमिटेड
७) वडाळा येथील सॉल्टपॅन विभागातील २१८ मिळकती
८) मुंबई महापौरांचा बंगला

वरील जागांपैकी अनु.क्र. ८ येथील मुंबई महापौरांचा बंगला या जागेची समितीने शिफारस केली असून अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोलिसांसाठी एक लाख घरे बांधण्याबाबत

**(३) ६६३६ (०६-४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संतोष**

**दानवे (भोकरदन), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलिसांच्या ताब्यात असलेल्या भूखंडावर तात्काळ बांधकाम सुरू करून पोलिसांसाठी तब्बल एक लाख घरे बांधण्याचा शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यास तात्काळ हा गृह प्रकल्प सुरू करता येईल असेही महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण मंडळामार्फत गृह सचिवांच्या बैठकीत स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### द्रोणागिरी नोडमधील आयओटीएल कंपनीमधून नाप-त्याची झालेली गळती

**(४) ७१५८ (१०-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) द्रोणागिरी नोडमधील आयओटीएल कंपनीमधून माहे सप्टेंबर,२०१४ च्या सुमारास नाप-त्याची गळती झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नाप-त्यांच्या गळतीमुळे किती जणांना बाधा झाली आहे,

(३) असल्यास, काही दिवसांपूर्वीच याच कंपनीतून नाप-ता काढताना स्फोट झाला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कपंनीच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) होय हे खरे आहे, आयओटीएल कंपनीतून पाईपला होस पाडून सदर पाईपमधून नळी लावून त्याद्वारे नाफ्ता ऑईल कंटेनर टँक मध्ये भरुन चोरी करत असताना स्फोट झाला होता. सदर स्फोटात कोणीही मनुष्य जखमी नाही व त्या अनुषंगाने उरण पोलीस ठाणेत गुन्हा रजि.क्र.५५/२०१४ भादवि ३७९, २८५, ३४ सह पेट्रोलियम अॅक्ट नॅचरल अॅड गॅस रेग्युलीटी बोर्ड अधि.२००६ चे कलम ४९ अन्वये दि.२०/०३/२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेने एलबीटी लागू केल्याबाबत**

**(५) ७३५५ (०६-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेने एलबीटी लागू होण्याआधी ठाणे महानगरपालिकेची जकात कराची, मद्यविक्रेते आणि सराफांकडे सुमारे ६८५ कोटीची रक्कम थकित असून ती वसुल केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती डबघाईत असतांनाही सदर रक्कम थकीत असण्याची कारणे काय आहेत व सदर रक्कम तातडीने वसूल करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.
तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. २६५८०/१४ मध्ये मद्य विक्रेते व सराफ यांच्याकडून जकात कर वसुल केला नसल्याबाबत नमुद केले आहे. तसेच स्थानिक दैनिकांमध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले आहे.
(२) व (३) मद्य विक्रेत्यांना नोटीस देऊन जकात कर भरल्याबातचे दप्तराची मागणी करुन आतापर्यंत रुपये ९.८७ कोटी व सराफाकडून रुपे २६ लक्ष इतक्या रकमेची वसूली केलेली आहे.

---

**मालेगांव महानगरपालिका (जि.नाशिक) प्रशासन आयुक्ताकडून विविध प्रस्तावाबाबत**

**(६) ७५५८ (०७-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव महानगरपालिका (जि.नाशिक) प्रशासन आयुक्ताकडून महासभा क्र. १ दिनांक १७ जानेवारी, २०१५ चे विषय क्र. ५ अन्वये महानगरपालिका हद्दीतील रविवार वॉर्डातील स.न. २३४

ची जागा महानगरपालिका मालकीचे असून मंजूर विकास योजना (दुसरी सुधारित) च्या प्रस्तावाप्रमाणे झोन फॉर स्लम अस्तित्वात प्राथमिक शाळा, आरक्षण क्र. ३६३ व आरक्षण क्र. ३६४, प्राथमिक शाळा या कारणासाठी आरक्षित दर्शविलेले असतांना या ठिकाणी लोखंडी कॅबिन (दुकाने) ठेऊन उभारण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची जागा आरक्षित आहे, तेव्हा आरक्षण व्यतिरिक्त दुकाने उभारणे सदरहू जागेचा गैरवापर होत आहे, मालेगाव महानगरपालिकेने प्रशासनाने मंजुरी दिलेल्या आरक्षणाचा गैरवापर करण्याचे काम सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या आरक्षित जागेचा गैरवापर टाळण्यासाठी शासनाने कोणती चौकशी केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) अशा प्रकारच्या ठरावास मालेगाव महानगरपालिकेच्या महासभेने ठराव क्र.५ दिनांक १७.१.२०१५ अन्वये मान्यता दिलेली असून, सदर ठराव विखंडीत करण्याबाबत आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांनी प्रस्तावित केले आहे.
सदर ठरावाची अंमलबजावणी मालेगाव महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आलेली नसल्याने जागेचा गैरवापर होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई सिडको हद्दीतील ओवे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील घोलवाडी आदिवासी पाडयातील रहिवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) ८१८५ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई सिडको हद्दीतील ओवे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील घोलवाडी आदिवासी पाडयातील रहिवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी सिडकोने २० कोटी रुपये खर्च करुन उभारलेल्या जलकुंभातून पाणी पुरवठा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास सिडको प्रशासनकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घोडवाडी आदिवासी पाडयातील रहिवाशी पाण्यासाठी डोंगरवरील नाल्यात खड्डे खोदून पिण्याच्या पाण्याची सोय करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी पाडयातील रहिवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी उक्त जलकुंभातून पाणी पुरवठा करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,
(४) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१), (२), (३) व (४) ओवे (ता.पनवेल) येथील घोलवाडी आदिवासी पाड्यातील रहिवाश्यांना पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सिडको कार्यलयास निवेदन प्राप्त झालेले नाही.

सिडको हेटवणे पाणीपुरवठा योजनेतून पुरेसा पाणीपुरवठा खारघर येथील सेक्टर २६ मधील बृहत संकलीत जलकुंभात करण्यात येणार असून सेक्टर २६ येथील बृहत संकलीत जलकुंभावरील पंपगृहात जास्त दाबाचे व वाढीव क्षमतेचे पंप संच व विद्युत रोहित्र बसविण्याचे प्रस्तावित आहे. तद्नंतर सदर जलकुंभातून आजुबाजूच्या परिसरात पाणी पुरवठा करता येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मीरा रोड (जि.ठाणे)येथील रियल एकर्स कंपनीकडून ग्रहाकांची झालेली फसवणूक

**(८) ८२२४ (०७-०५-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा रोड (जि.ठाणे)येथे रियल एकर्स बोगस कंपनी स्थापन करून घरे देण्याच्या जाहिराती करून सुमारे ७० ग्राहकांना लाखो रूपयांचा गंडा घालून पोबारा करणा-या आरोपींना पकडण्यात पोलीसांना अपयश आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) व (२) सदर प्रकरणी मिरारोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि.क्र. ४३३/२०१२ भादंविसं कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करणत आला आहे. सदर गुन्ह्यात निष्पन्न ६ आरोपी पैकी ३ आरोपींना अटक केलेली असून त्यांच्याकडून फसवणूक करुन अपहार रक्कमेपैकी ३,२९,०५,५००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर आरोपींविरुध्द मा.न्यायलायत दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

गुन्ह्यातील उर्वरीत तीन आरोपी अद्यापपावेतो फारारी आहेत, सदर आरोपींना अटक करुन मा.न्यायालयात पुरवणी दोषारोपपत्र सादर करण्याची तजवीज ठेवली अहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सानेगुरुजी नगर (बी) कमिटी सेवा संघ को-ऑप हौ.सो.(नि.) येथील झोपडपट्ट्याच्या पुनर्विकासाबाबत**

**(९) ८८३८ (०७-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, मुंबई येथील जी.बी.सकपाळ मार्गस्थित सानेगुरुजी नगर (बी) कमिटी सेवा संघ को.ऑप हौ.सो. (नि.) येथील झोपडपट्टीचे परिशिष्ट-२ मंजूर करण्याबाबतची अंतिम कार्यवाही महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागामार्फत सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या ठिकाणी महानगरपालिकेचे ३३ टक्के आरक्षण असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी परिशिष्ट-२ देऊ नये अशी नोटीस पी.पी.पी. विभाग, वरळी यांना पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत संबंधितांना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत वारंवार बैठका घेऊनही आजतागायत कोणताही तोडगा निघालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सानेगुरुजी नगर (बी) कमिटी तेथील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास होण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रस्तावित असलेल्या भूभागावर "रिफ्युज ट्रान्स्फर स्टेशन" चे आरक्षण असल्यामुळे साने गुरुजी (बी) कमिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेस परिशिष्ट-२ वितरीत करण्यात येऊ नये असे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शहर) यांनी प्रथमत: दिले होते. परंतु याबाबत तद् नंतर दिनांक १७.०७.२०१४ रोजी अतिरिक्त आयुक्त (शहर) यांच्या दालनात झालेल्या बैठकीदरम्यान सदर योजनेअंतगत रिफ्युज ट्रान्स्फर स्टेशनकरिता जास्तीत जास्त किती बांधीव व मोकळी जागा उपलब्ध करता येईल याबाबतचे असुधारीत आराखडे संस्थेच्या वास्तुविशारदाने सादर करावे जेणेकरुन याबाबतीत उचित निर्णय घेणे शक्य होईल असे ठरले होते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर प्रकरणात विकासक /वास्तुविशारद यांना वारंवार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी महागनरपालिकेच्या विविध खात्यांतर्फे पत्र पाठवूनही आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होत नसल्याने सदर प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी दिनांक १८.०३.२०१५ अन्वये उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे पाठविला आहे.

---

**नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपरिषदेकडे वर्ग झालेल्या कर्मचाऱ्यांना वसई-विरार शहर महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(१०) ९०५४ (०८-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई रोड (पूर्व) परिसरातील पेल्हार योजनेवरील तत्कालीन नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपरिषदेकडे वर्ग झालेल्या कर्मचाऱ्यांना वसई-विरार शहर महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यासाठी पदनिर्मिती करणे व त्यांच्या वयाची तसेच शिक्षणाची अट शिथिल करण्याबाबतच्या मागणीचा एक प्रस्ताव आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र क्र.वविशम/आस्था/३२१/२०११, दिनांक २० जुलै, २०११ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) वसई-विरार शहर महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) नुसार आपल्या सर्वसाधारण महासभेत दिनांक १९ जानेवारी, २०११ रोजी ठराव क्र.१२ अन्वये सदर कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेत सामावून घेण्यासाठी पदनिर्मिती करणे व त्यांच्या वयाची व शिक्षणाची अट शिथिल करण्याबाबत मंजूरीही दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) शासन निर्णय नगरविकास विभाग परिपत्रक नपाक्र/१०९९/प्रक्र १५९/९८-नवि दिनांक ६ मार्च, २०१० अन्वये राज्यातील सर्व नगरपरिषदांमधील दिनांक १० मार्च, १९९३ रोजी रोजंदारांवरील असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना वसई-विरार शहर महानगरपालिकेत सामावून घेण्याच्या दृष्टिने महानगरपालिकेने पाठविलेल्या सदरहू प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) उक्त विषयाबातचा प्रस्ताव दिनांक २५.०२.२०१५ च्या पत्रान्वये शासनाकडे प्राप्त झला आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी दिनांक २५.०२.२०१५ अन्वये सादर केलेला प्रस्ताव त्रोटक स्वरुपाचा असल्याने सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त, वसई विरार शहर महानगरपाकिा यांना दिनांक ०१.०६.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने प्रलंबित योजनाबाबत**

**(११) ९३९९ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने प्रलंबित योजनापुर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाला शासनाकडून अनुदान मिळावे अथवा करप्रणाली बळकट

करुन महापालिकेला स्वावलंबी करण्याबाबत सशक्त कर प्रणाली लागू करण्यासाठी शासनाकडे शिफारस करावी अशी मागणी आयुक्त, महानगरपालिका, उल्हासनगर यांनी राज्य वित्त आयोगाच्या अध्यक्षांची दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी भेट घेऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने राज्य वित्त आयोगाच्या अध्यक्षाने सदर मागणी शासनाकडे मंजुरीसाठी पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उल्हासनगर महापालिकेची मागणी मंजूर केली आहे काय वा त्याबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिकेतील वर्ग “क” व “ड” मधील मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर सामावून घेण्याबाबत**

**(१२) ९४५३ (०६-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेतील वर्ग “क” व “ड” मधील मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर महानगरपालिका आस्थापनेवर सामावून घेणेसाठी पदनिर्मिती करणे व शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करणे या विषयीचा एक प्रस्ताव आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी त्यांचकेडील पत्र क्र.वविशम/आस्था/१८०/२०१२-१३, दिनांक ११ जून, २०१२ अन्वये सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१), (२) व (३) सन २०१२ मध्ये सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय होऊ न शकल्याने सन २०१४-१५ या वर्षाचा आस्थापना खर्च, अनुकंपा तत्वाबातचे धोरण संदर्भातील अद्यावत माहिती वसई विरार शहर महानगरपालिका यांच्याकडून मागवुन निर्णय घेण्यात येईल.

---

**वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य सेवा अपुरी असल्याबाबत**

**(१३) ९४८२ (०७-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे १६ लाख लोकवस्तीसाठी आरोग्य सेवा पुरविण्याकरिता विरार येथील ग्रामीण रुग्णालय लोकसंख्येच्या व आरोग्य सेवेच्या मानांकनानुसार अत्यंत अपुरे पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालय संबंधित जमिनीसह वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्यास तिथे अद्ययावत व सुसज्ज असे मोठे रुग्णालय स्वखर्चाने बांधण्याचा प्रस्ताव वसई-विरार शहर महानगरपालिकेने शासनाकडे ५ वर्षापूर्वी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर प्रस्ताव किती मुदतीत मंजूर करण्यात येईल अशी अपेक्षा आहे,

(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर प्रस्ताव किती मुदतीत मंजूर करण्यात येईल अशी अपेक्षा आहे,

(५) वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील दिवसेंदिवस वाढीस लागलेली व तेथील जनतेला चांगल्या आरोग्य सेवा विनाविलंब उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदरहू ठिकाणी सुसज्ज व भव्य रुग्णालय उभारुन कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) तत्कालीन महापौर व मा.आमदार यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे.

सदरचे ग्रामीण रुग्णालय अद्याप महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले नसल्याने प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही झालेली नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास विभागातला विकासकांचा हस्तक्षेप रोखण्यासाठी इथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवून, तिऱ्हाईत व्यक्तीला प्रवेश बंद करण्याबाबत**

**(१४) ९८४७ (०७-०४-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास विभागातला विकासकांचा हस्तक्षेप रोखण्यासाठी इथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवून, तिऱ्हाईत व्यक्तीला प्रवेश बंद करण्यात आला असतानाही काही अधिकारी आणि विकासकांचे प्रतिनिधी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी रात्रौ कार्यालयात जाऊन संगणकावर फेरफार करत असल्याची बाब उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या Pre DCR प्रणालजीमध्ये विकासकांचा Online प्रस्ताव Run करताना येणा-या त्रुटींची पूर्तता वास्तुविशारदाकडून करुन घेऊन विकास प्रस्ताव अद्ययावत सादर करण्यासाठी वास्तुविशारद/ प्रतिनिधी व विकासक/प्रतिनिधींना शहर विकास विभागामध्ये उप अभियंता यांच्या उपस्थितीत अडचणीचे निरसन करुन प्रस्ताव अद्ययावत करण्याची पध्दत प्रचलित आहे. त्यानुसार दिनांक ७.१.२०१५ रोजी मे.क्लॉरिएंट केमिकत्स इंडिया लि. चे वास्तुविशारदांचे व विकासकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सबब. संगणकावर सुरु असलेले काम शहर विकास विभागातील प्रचलित पध्दतीप्रमाणे सुरु होते. या कार्यवाहीचे वेळी कोणत्याही अधिका-याने किंवा विकासकाच्या प्रतिनिधींने संगणकावर फेरफार केलेला नाही.
(२) अनु.क्र.१ मध्ये दिलेल्या उत्तरामधील नमूद सविस्तर वस्तुस्थितीचा विचार करता कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**रायगड जिल्ह्यातील उरण शहरातील बाजारपेठेतील अनेक इमारती या जीर्ण झाल्या असून त्या कधीही कोसळण्याची भिती निर्माण झाल्याबाबत**

**(१५) १०६२१ (०७-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील उरण शहरातील बाजारपेठेतील अनेक इमारती या जीर्ण झाल्या असून त्या कधीही कोसळण्याची भिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजारपेठेतील व भरवस्तीतील ३० ते ४० वर्षापूर्वीच्या एका इमारतींच्या मजल्याचा काही भाग कोसळून दुर्घटना झाली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार उक्त इमारतींची पुर्नबांधणी करण्यासंदर्भात शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) उरण शहरातील बाजारपेठेमध्ये बैठ्या स्वरुपाची व एक मजली कौलारु छत/सिमेंट पत्र्यांची घरे आहेत. त्यातील काही घरे ही जुनी झाली आहत. बाजारपेठेतील ६ जीर्णावस्थेतील घरांची दुरुस्ती करणे/पाडून टाकणेबाबत महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ चे तरतूदीनुसार

नगरपरिषदेने संबंधितांस नोटीसा दिलेल्या असून संपूर्ण शहरामध्ये एकूण ८८ जीर्णावस्थेतील घरांना उक्त कलमान्वये नोटीसा मे २०१५ मध्ये बजावल्या आहेत. यामधील सहा इमारती बाजारपेठेत आहेत.
(२) व (३) उरण शहरातील मुख्य बाजारपेठेमध्ये अशी घटना गेल्या दोन वर्षात घडल्याचे निदर्शनास आलेले नाही. परंतु उरण वाणी आळी येथील म्यु. घर नं. ५२१-अ हे घर जीर्णावस्थेत असल्याने नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १९५ चे तरतुदीनुसार दिनांक ४.६.२०१४ अन्वये घरमालकांना नोटीस देऊन सदर घरांचा वापर बंद करणेविषयी कळविले होते. सदर घराच्या वरच्या मजल्याचे छताचा काही भाग दिनांक १६.७.२०१४ रोजी अतिवृष्टीमुळे कोसळला आहे. परंतु त्यामध्ये कोणतीही जीवीत हानी झालेली नाही.
(४) सदरच्या घरांची तातडीने दुरुस्ती करुन घेणेविषयी किंवा पाडून नव्याने बांधणेबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कम १९५ अन्वये नगरपरिषदेने नोटीसा दिलेल्या असून सदर घराची दुरुस्ती घरमालक यांनी करणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी - निजामपूर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने कचराकुंडी मुक्त शहर करण्याबाबत

**(१६) १२३५५ (०७-०४-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) भिवंडी - निजामपूर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने कचराकुंडी मुक्त शहर करण्याची योजना आखली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागाच्या उपायुक्त विजया कंठे व स्वच्छता विभागाचे एस.एल.सोनावणे हे केवळ घंटागाडीचा फार्स करीत असून एका वर्षापासून ही यंत्रणा कमकुवत ठरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने कचराकुंडी मुक्त शहर करण्याची योजना आखली असून एकूण ९० वार्डामध्ये ९० घंटागाड्यामार्फत दिनांक १.११.२०१४ पासून नागरीकांच्या घरोघरी जावून कचरा गोळा करण्याची मोहिम सुरु करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही. दिनांक १.११.२०१४ पासून सर्व प्रभागात घंटागाड्या कार्यरत असून स्वच्छ भारत अभियान यशस्वीपणे राबविले जात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील नालासोपारा येथे सम्राट अशोक कालीन बौध्दलेणी व स्तुपाचे अवशेष असल्याबाबत**

**(१७) १४९५२ (०८-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील नालासोपारा येथे सन २०१० मध्ये सम्राट अशोक कालीन बौध्दलेणी व स्तुपाचे अवशेष आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अशोक कालीन बौध्दलेणी व स्तुपाचा जिर्णोध्दार कार्यास वसई-विरार महानगरपालिकेला निधी देण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) सदर स्तुपाची जागा सुमारे ४ एकर असून ती संपूर्ण जागा पुरातत्व विभागाच्या ताब्यात व नियंत्रणत आहे. वसई विरार शहर महापालिकेने जिर्णोध्दारासाठी शासनाकडे निधीची मागणी केलेली नाही.

---

**सातगाव (ता.सालेकसा, जि.गोदिंया) येथे पोलीस स्टेशन इमारतीचे कामाबाबत**

**(१८) १५७२४ (०७-०४-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातगाव (ता.सालेकसा, जि.गोदिंया) येथे येथे सन २०१३-१४ मध्ये पोलीस स्टेशन इमारत मंजूर झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस स्टेशन इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक व कर्मचारीयांचेवर पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यास नकार देण्यात आल्याबाबत**

**(१९) १७१९१ (१२-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक व कर्मचारी यांनी केलेल्या कोटयावधी रुपयांच्या अपहाराबद्दल जालना, बीड, परभणी व बुलडाणा येथील पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यास नकार देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपहारा बद्दल संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्द गुन्हा न नोंदविण्याची कारणे काय आहेत,
(३) या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यास टाळटाळ करणा-या पोलीस अधिका-या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

दि.२३/४/२०१५ रोजी प्रादेशिक व्यवस्थापक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) औरंगाबाद यांनी पोलीस अधिक्षक, बीड यांचेकडे महामंडळाच्या ४ अधिकारी कर्मचारी यांच्या विरुध्द तक्रार दिली होती. सदर तक्रारीची चौकशी करुन चौकशीमध्ये निधीचा अपहार होवून शासनाची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाल्यावरुन पोलीस ठाणे शिवाजीनगर बीड येथे दि.९/५/२०१५ रोजी गु.र.नं.१३५/२०४५ भा.दं.वि. कलम ४०८, ४०९ प्रमाणे उक्त नमुद ४ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### राज्यातील मल्टिप्लेक्स चित्रपटगृहात मराठी चित्रपटाचे शो दाखविण्याबाबत

**(२०) १७५५१ (३१-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मल्टिप्लेक्स चित्रपटगृहात मराठी चित्रपटाचे १२४ शो दाखविले पाहिजे असे शासनाचे आदेश असताना मल्टिप्लेक्स चित्रपटगृहे मराठी चित्रपटाचे शो दाखविण्यास दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी चित्रपट मल्टिप्लेक्स चित्रपटगृहात दाखविण्यास शासनाचे आदेश असताना मराठी चित्रपट दाखविले जात नसल्याने मराठी चित्रपट दाखविणे बंधनकारक करण्यासाठी नवीन अध्यादेश काढण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा अध्यादेश काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील सर्वच पोलीस ठाण्यामध्ये पारपत्र पडताळणीचे प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) १७६२७ (१२-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील सर्वच पोलीस ठाण्यामध्ये असलेल्या पारपत्र पडताळणी कक्षामध्ये (पासपोर्ट व्हेरिफिकेशन) केवळ एक किंवा दोनच कर्मचारी असल्याने गेल्या अनेक महिन्यापासून तब्बल ३ हजार ४६९ पारपत्र पडताळणीचे प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पारपत्र पडताळणीच्या प्रकरणाचा त्वरीत निपटारा होण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१५) :** (१) व (२) पुणे शहर येथे पारपत्र पडतळणीसाठी दरररोज सरासरी ८५० ते ९०० अर्ज प्राप्त होत असतात पारपत्र पडताळणीसाठी यंत्रणा व मनुष्यबळ पुरेसे असून प्रत्येक पोलीस स्टेशन येथे पारपत्र पडताळणीसाठी स्वतंत्र कक्ष अस्तित्वात आहे व कामाच्या स्वरुपानुसर १ ते ३ पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तालय येथे पारपत्र पडताळणी विभाग असून तेथे ९ पोलीस कर्मचारी २ सत्रांमध्ये कार्यरत असतात. दि.२१.०२.२०१३ पासून पारपत्र पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. त्यामुळे प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना पारपत्र मिळणे सुलभ झाले आहे. दि.१.१.२०१५ ते दि.३०.०६.२०१५ या कालावधीत ७०५१४ पारपत्र प्रकरणे प्राप्त झाली असून ६४९७९ पारपत्र प्रकरणे पडताळणी करुन पाठविण्यत आली आहेत व उर्वरित ५५३५ प्रकरणे तडताळणीच्या प्रक्रियेमध्ये आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरातील विविध भागात अंमली पदार्थ विक्रीचे रॅकेट असल्याबाबत**

**(२२) १७८९२ (१०-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील विविध भागात अंमली पदार्थ विक्रीचे रॅकेट कार्यरत असून, नौपाडा येथील एका तरुणाचा दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अंमली पदार्थाचा पुरवठा करणाऱ्यांविरोधात कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) अंमली पदार्थाचा पुरवठा/व्यवहार करणाऱ्या इसमांविरुध्द केलेल्या कारवाईबाबत जानेवारी, २०१५ ते जुलै, २०१५ पावेतो १८ गुन्हे दाखल असून पुढील चौकशी चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळवा (जि.ठाणे) रेल्वे स्थानकात महिला पत्रकारावर हल्ला केल्याबाबत

**(२३) १८१७२ (१२-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवा (जि.ठाणे) रेल्वे स्थानकात महिलांच्या रेल्वे डब्यात शिरुन महिला पत्रकारावर हल्ला करुन मोबाईल हिसकावून चोरटे पसार झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१५) :** (१) व (२) होय.
(३) सदर प्रकरणी ठाणे रेल्वे पोलीस स्टेशन येथे दि. ८.४.२०१५ रोजी गु.र.क्र.२१८/२०१५ कलम ३५४, ३९७ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील दोन आरोपींपैकी एका आरोपीस दि. ९.४.२०१५ रोजी अटक करण्यात आली असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. अन्य आरोपीचा शोध सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदूर्ग या चार जिल्हयाचे कार्यक्षेत्र आणि कोटयावधीचे उत्पन्न असलेल्या पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्ष रिक्तपद भरणेबाबत

**(२४) १८४८३ (१०-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदूर्ग या चार जिल्ह्याचे कार्यक्षेत्र आणि कोटयावधीचे उत्पन्न असलेल्या पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्ष पद चार वर्षापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पद रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच देवस्थानाचा कारभार व्यवस्थित चालावा म्हणून सदर अध्यक्षपद तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१५) :** (१) ते (४)
अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार जिल्हाधिकारी, कोल्हापूर, यांच्याकडे सोपविण्यात आला असून सदर पदावर नियमित नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**अंमली पदार्थाची माफिया बेबी उर्फ शशिकला पाटणकर यांना समाज सेवा शाखेच्या अधिकाऱ्यांनी अटक केल्याबाबत**

**(२५) १८४८७ (१२-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार धर्मा काळोखे यांच्याकडे कोटयावधी रुपयांचे अंमली पदार्थ सापडल्यानंतर या प्रकरणी मुख्य सुत्रधार म्हणून अंमली पदार्थाची माफिया बेबी उर्फ शशिकला पाटणकर यांना समाज सेवा शाखेच्या अधिकाऱ्यांनी पनवेल येथे दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर बेबी पाटणकर यांचे खात्यात ९७ लाखाची बेहिशोबी रोकड असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबत अटक आरोपीच्या बँक खात्यात तिचे विविध खाती गोठविताना रु. २ कोटी ३७ लाख ४७ हजार शिलक असल्याचे दिसून आले.
(३) व (४) होय.
सदर प्रकरणी गुन्ह्यादरम्यान मुख्य आरोपी शशिकला ऊर्फ बेबी पाटणकर हिच्या संपर्कात असलेले ४ अधिकारी व १ अमलदार याच्या अमली पदार्थ विरोधी कायदा-१९८५ कलम ५९(१) व २७(अ) प्रमाणे सहभाग आढळल्याने त्यांना या गुन्ह्यात अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत त्यांची जामीनावर सुटका झालेली आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपी शशिकला ऊर्फ बेबी पाटणकरसह इतर तीन आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. मुख्य आरोपी शशिकला ऊर्फ बेबी पाटणकर बँक खाती गोठविण्यात आली असून तिच्या विविध स्थावर व जंगम मालमत्तेबाबतची नार्कोटिक्स ड्रग्ज ॲण्ड सायकोट्रॉपिक सबस्टेन्सेस कायद्यांतर्गत सविस्तर चौकशी होण्याकामी स्मगलिंग ॲण्ड फॉरेन एक्सेंज मन्युपुलेटर्स (SAFEMA)मधील सक्षम प्राधिकारी यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बार्शी (जि.सोलापूर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयात राष्ट्रध्वज फडकावला नसल्याबाबत

**(२६) १८७३८ (२१-०८-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बार्शी (जि.सोलापूर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयात प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी कार्यालयात ध्वजारोहनाचा कार्यक्रम आयोजित करुन राष्ट्रध्वज फडकावला नसल्याची लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते श्री.दिनानाथ काटकर यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर व नोंदणी व मुद्रांक शुल्क कार्यालयाकडे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१५) :** (१) होय,
(२) होय,
सदर प्रकरणी सह. जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयाकडून चौकशी करण्यात आली सदर चौकशी अन्वये तक्रारीमध्ये तथ्थ आढळून आले नाही, सबब कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कायदा व सुव्यवस्थेबाबत**

**(२७) १९०११ (१२-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून बलात्कार, घरफोड्या, वेश्या व्यवसाय, हातभट्टी, दारुभट्टी, डान्सबार, वयोवृध्द नागरिकांवर होत असलेले हल्ले बंद करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दि.२८ मे, २०१५ रोजी पोलीस आयुक्त यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर येथे सुरु असलेले अनैतिक धंदे बंद करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१५) :** (१) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दि. २८.५.२०१५ रोजी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडे लेखी स्वरुपात अर्ज केला आहे, हे खरे आहे. तथापि, उल्हासनगर येथे कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झालेली नाही.

(२) उल्हासनगर येथे अनैतिक धंद्यांबाबतची माहिती मिळताच तात्काळ छपा टाकून कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासन प्रशासन व्यवस्थेवर होणारे भ्रष्टाचारावर उपाय सुचविण्यासाठी इन्टिट्युट ऑफ पब्लिक पॉलिसी संस्था स्थापन करण्याबाबत**

**(२८) १९१७८ (१०-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन प्रशासन व्यवस्थेवर होणारे भ्रष्टाचाराचे आरोप, आर्थिक घोटाळे नियोजनातील त्रुटी, धोरणांचा अभाव, यावर उपाय सुचविण्यासाठी इन्टिट्युट ऑफ पब्लिक पॉलिसी संस्था स्थापन करण्याचा शासनाच्या विचाराधिन प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतलेला आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व तो निर्णय तातडीने घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना व धोरणांचे शास्त्रोस्त पध्दतीने मूल्यमापन, संशोधन, विश्लेषण आणि अध्यापन करुन योजना व धोरणांमध्ये सकारात्मक बदल सुचविण्यास्तव महाराष्ट्र राज्य सार्वजनिक धोरण संस्था स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, अद्याप निर्णय घेतलेला नाही,

(२) प्रश्न उद्‌भवत नाही,
(३) सार्वजनिक धोरण संस्था स्थापनेबाबत सुधारित प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत यशदा, पुणे या संस्थेस कळविण्यात आलेले आहे, प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्यातील धर्मदाय रुग्णालयामध्ये तसेच पुणे शहरातील रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना मोफत उचार देण्यास टाळाटाळ केली जात असल्याबाबत**

**(२९) १९२९० (१२-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील चिंचवड येथे आदित्य बिर्ला रुग्णालयात गरीबांना मोफत उपचार दिले जात नाहीत अशी तक्रार धर्मादाय सहआयुक्त, पुणे कार्यालयाकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २८ मे, २०१५ रोजी धर्मादाय सहआयुक्त पुणे यांनी आपल्या ड्रायव्हरला रुग्ण बनवून स्वत: रुग्णांचे नातेवाईक बनून आदित्य बिर्ला रुग्णालयात गरीब रुग्णांस मोफत उपचार द्यावेत अशी मागणी केली, रुग्णालयाच्या सोशल वर्कर विभागाने धर्मादाय सहआयुक्तांना रुग्णास दाखल करुन घेण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील धर्मदाय रुग्णालये तसेच पुणे शहरातील आदित्य बिर्ला हॉस्पीटल, रुबी हॉल क्लिनिक, जहाँगीर हॉस्पीटल, संचेती हॉस्पीटल, इनलॅक्स बुधराणी हॉस्पीटल इ. रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना १०% राखीव खाटा योजनेतून मोफत उपचार देण्यास टाळाटाळ केली जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनस्तरावरून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१५) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) पुणे शहरातील धर्मादाय रुग्णालयामध्ये गरीब रुग्णांना १०% राखीव खाटा योजनेतुन मोफत उपचार देण्यास टाळाटाळ केली जात नाही. तसेच मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या योजनेअंतर्गत निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत दिले जातात. तथापि, या योजनेअंतर्गत उपचार देण्यास टाळाटाळ केल्याची तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भूसावळ तालुक्यातील (जि.जळगाव) कन्हाळे खुर्द येथे गांजा जप्त केल्याबाबत**

**(३०) १९९६७ (१०-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसावळ तालुक्यातील (जि.जळगाव) कन्हाळे खुर्द येथील प्रल्हाद शंकर कोळी याच्या मालकीच्या गट नं ७/१२ या शेतात मक्याच्या पिकात स्थानिक गुन्हे शाखा आणि तालुका पोलीस स्टेशनच्या पथकाने दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास धाड टाकून २५ किलो ५० हजार रुपये किंमतीचा ओला गांजा जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतात बांध्यालगत ५ ते ६ फूट उंचीचे गांज्यांची झाडे आढळून आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) होय.

प्रकरणी आरोपीविरुध्द भूसावळ तालुका पेलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३०१०/२०१५ एनडीपीएस का.क्र. २०, २२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) होय.

(३) होय.

नमूद गावात आरोपीचे शेत गट नं. ७/२ मध्ये आरोपीने विना परवाना बेकायदेशीररित्या रु.५००००/- किंमतीची हिरवी ताजी एकूण ११ गांजाची झाडे वजन सुमारे २५ कि.ग्रॅ. जोपासना करुन कबज्यात बाळगल्याचे निष्पन्न झाल आहे.

गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन पोलीस कोठडी व न्यायलयीन कोठडी घेण्यात आली असून गुन्ह्याच तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**औसा (जि.लातूर) येथील नवीन न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्याबाबत**

**(३१) २०१६५ (१२-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) येथील नवीन न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामास शासनाकडून मंजूरी मिळालेली असतानाही आजमितीस सुमारे अडीच वर्षाहून अधिक कालावधी लोटला असतानाही सदरहू न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामास सुरुवातच झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर येथील न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) सदरहू न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम विनाविलंब हाती घेवून ही इमारत न्यायालयीन कामासाठी लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१५) :** (१) नाही,
(२) व (३) औसा जि. लातूर येथे नवीन न्यायालय इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय यांचेकडून माहे जानेवारी २०१५ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे. प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**बेलकुंड ता.औसा येथील महिलेने लातूर बसस्थानकात स्वत:सह**
**एस.टी. महामंडळाची बस पेट्रोल टाकून पेटविल्याबाबत**

**(३२) २१०३२ (१४-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भादा (ता.औसा, जि.लातूर) येथील पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीची चौकशी करून कारवाई करण्यास टाळाटाळ होत असल्या कारणाने निराश होवून बेलकुंड ता.औसा येथील महिलेने लातूर बसस्थानकात स्वत:सह एस.टी. महामंडळाची बस पेट्रोल टाकून पेटविली असल्याचे दिनांक २४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व सदर प्रकरणी दोषीवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) आरोपी महिलेने बहिणीला नांदवत नसल्याने बहिणीच्या पतीविरुध्द केलेल्या तक्रारीवर तिचे इच्छेप्रमाणे कारवाई झाली नाही. म्हणून दि.२०/५/२०१५ रोजी नैराश्येपोटी बाटलीतील पेट्रोल एस.टी.बस मध्ये टाकून बाहेरुन काडी लावून पेटवून दिले. त्यामध्ये बसमधील सिट जळाल्या हे खरे आहे,
(२) व (३) होय.

प्रकरणी एस.टी बस चालकाने दिलेल्या फिर्यादिवरुन आरोपी महिलेविरुध्द गांधी चौक पोलीस स्टेशन, लातूर येथे गु.र.नं. १२९/२०१५ भा.दं.वि. कलम ४ प्रमाणे गुन्हा नोद केला आहे. गुन्हयांच्या तपासात आरोपी महिलेच्या बहिणीचा पती बहिणीस नांदवत नाही. त्यामुळे तीने पोलीस स्टेशन भादा येथे व मुंबई येथे तक्रारी केल्या परंतु सदर पती विरुध्द ठोस कारवाई झाली नाही म्हणून तिने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्हयांच्या तपास पुर्ण करुन आरोपी महिलेविरुध्द दि. २५/०७/२०१५ रोजी मा.न्यायालयात दोषारोप दाखल केले आहे.
सद्य:स्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील कौटुंबिक न्यायालयात समुपदेशकांची रिक्त पदे

**(३३) २१३७४ (१०-०८-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कौटुंबिक न्यायालयात समुपदेशकांची ७० पदे रिक्त असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्य वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटांचे खटले मोठया प्रमाणात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीच्या अनुषंगाने कौटुंबिक न्यायालयातील समुपदेशकांची रिक्त पदे भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारणा कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद् भवत नाही.
(३) प्रश्न उद् भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील गर्भवती महिलांच्या मृत्यूबाबत

**(३४) २१९१९ (११-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेने माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार पुणे शहर हद्दीत सन २०१४-१५ या वर्षात ६६ गर्भवती महिलांचा मृत्यू झाला असल्याची बाब समोर आली असून मृत्युच्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गर्भवती महिलांचे मृत्यु प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) पुणे शहर हद्दीत सन २०१४-१५ या वर्षात ६६ गर्भवती महिलांचा मृत्यू झाला असून या पैकी २६ महिला या पुणे शहरातील रहीवासी आहेत. उर्वरित ४० महिला या पुणे ग्रामीण, कॅटोन्मेंट व आसपासचे ग्रामीण भागातून संदर्भीत करण्यात आलेल्या महिला आहेत.

सन २०१३-१४ पेक्षा सन २०१४-१५ मध्ये पुणे शहर हद्दीत मृत पावलेल्या मातांच्या संख्येमध्ये १३ ने वाढ झाली, अशी वस्तुस्थिती आहे.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक २८.५.२०१० नुसार पुणे महानगरपालिकेच्या स्तरावर वैद्यकीय तज्ञांची माता मृत्यू समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत पुणे शहरामध्ये होणाऱ्या प्रत्येक माता मृत्युचे अन्वेषण करण्यात येते.

पुणे महानरगपालिकेच्या सर्व प्रसुतिगृहांची व ज्या खाजगी रुग्णालयांमध्ये दर वर्षी २५० पेक्षा अधिक प्रसुति होतात अशा खाजगी रुग्णालयाची स्वत: माता मृत्यू अन्वेषण समिती कार्यरित आहे.

माता मृत्यू अन्वेषणाअंती केलेल्या recommendation च्या आधारे गर्भवती महिलांचे मृत्यूचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

- रक्तक्षय असलेल्या महिलांना मोफत लोह व कॅल्शीयम गोळ्यांचे वाटप करणे.
- महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये (१२ आठवड्याच्या आत) गरोदर स्त्रीयांची नाव नोंदणी करुन नियमीत तपासण्या करणे.
- गरोदर स्त्रियांच्या अहाराबाबत योग्य समुपदेश करणे.
- कुटुंब कल्याण केंद्राच्या ए.एन.एम. सेविकांमार्फत नियमित तपासणी करिता न येणाऱ्या गर्भवतींना व प्रसूतीनंतर गृहभेटी देणे.
- उच्च रक्तदाब असलेल्या गर्भवती महिलांवर रुग्णालयात उपचार करणे.
- एच१ एन१ व काविळ सारख्या आजारांचे त्वरीत निदान व उपचार करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील पासपोर्ट (पारपत्र) कार्यालय पुण्यात हलविण्यात आल्यामुळे येथील पोलिस मुख्यालयातील कार्यालयात ६ हजार ४६३ अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) २१९७८ (१२-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील पासपोर्ट (पारपत्र) कार्यालय पुण्यात हलविण्यात आल्यामुळे येथील पोलिस मुख्यालयातील कार्यालयात ६ हजार ४६३ अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर येथे किमान प्रत्येक महिन्यात कॅम्पचे आयोजन करण्याची मागणी नागरीकांनी संबधित अधिका-यांकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१५) :** (१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दि.१७.०८.२०१५ अखेरपर्यंत एकूण ४८,८२९ पारपत्र प्रकरणे प्राप्त झाली होती. त्यापैकी ४३,७९७ पारपत्र प्रकरणे निर्गमित करुन सदर प्रकरणे पारपत्र कार्यालय पुणे येथे दाखल करण्यात आली असून उर्वरित ५,०३२ पारपत्र प्रकरणे पडताळणीच्या प्रक्रियेमध्ये असून ती तातडीने पूर्तता करण्याची तजवीज ठेवली आहे.

(२) जिल्हा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर कार्यालयाकडे मागणी करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी चिंचवड देवस्थानाच्या जागेवर आदित्य बिर्ला रुग्णालय सुरु केल्याबाबत**

**(३६) २२३०२ (१४-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदित्य बिर्ला फाउंडेशन ही धर्मादय संस्था असून, त्यांनी पिंपरी चिंचवड येथे दिनांक १४ नोव्हेंबर, २०११ रोजी चिंचवड देवस्थानच्या मालकीची जागेवर गरीब रुग्णांसाठी दहा टक्के खाटा आरक्षित ठेवण्याचे अटीवर आदित्य बिर्ला रुग्णालय सुरु केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार रुग्णालय सुरु झाल्यापासून गरीब रुग्णाच्या उपचारावर खर्च न केलेली रक्कम ही गरीब रुग्ण निधीत जाम करण्याचे व ज्या रुग्णांना यापूर्वी उत्पन्नाचा पुरावा असूनही सवलत मिळाली नाही, त्यांना बिलाची रक्कम परत करण्याचे मा.धर्मादाय सह आयुक्ताचे आदेशानंतर आजवर सदरहू रक्कम रुग्ण कल्याण निधीत जमा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषींवर कुठली कारवाई करणेत आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१५) :** (१) होय,
(२) नाही, मा.उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या योजनेतील तरतूदीनुसार एकुण उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम गरीब रुग्ण निधीत ठेवण्यात आली आहे. तसेच, ज्या पात्र रुग्णांना यापूर्वी सवलत देण्यात आली नव्हती त्या प्रकरणांची शहानिशा करुन त्यांचे उपचाराचे पैसे परत केले जात आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या विस्तारित इमारतीचे बांधकाम**

**(३७) २२३०३ (११-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या विस्तारित इमारतीचे बांधकाम एफएसआय शिल्लक नसतानाही सुरु असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू काम अपात्र ठेकेदाराला दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, जनतेच्या पैशाच्या चुकीच्या पध्दतीने विनियोग करणा-या दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) पुणे महानगरपालिकेच्या विस्तारित इमारतीचे चटई क्षेत्र मुक्त लोअर बेसमेंट पार्किग व अप्पर बेसमेंट पार्किंगचे बांधकाम सुरु आहे.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजी मंत्री कृपाशंकर सिह व त्यांच्या कुटुंबियांनी बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याबाबत**

**(३८) २२४५० (१२-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजी मंत्री कृपाशंकर सिंह व त्यांच्या कुटुंबियांनी सुमारे १९ कोटी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याबाबत त्यांचेविरुध्द मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखा पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्हयाचा तपास पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तपासात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पोलीस आयुक्त यांच्या देखरेखीखाली विशेष पोलीस पथकाने दि.२८.०२.२०१२ रोजी निर्मल नगर पोलीस ठाणे येथे माजी मंत्री श्री.कृपाशंकर सिंह व त्यांच्या कुटूंबियांविरुध्द बेहिशोबी मालमत्ता जवळ बाळगल्याबाबत गु.र.क्र.४२/२०१२ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम १३ (१) ड व १३(१) ई सन १२० (ब) सह ४०९, ४६७, ४६८, ४७१, २०१ भादंविसं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन माजी मंत्री श्री. कृपाशंकर सिंह व त्यांच्या कुटुंबियांविरुध्द मा.विशेष सत्र न्यायालय, कोर्ट क्र. ४६ मुंबई यांच्या न्यायलयामध्ये दि.३.४.२०१५ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चोपडा (जि.जळगांव) शहरातून १० लाख रुपयाने भरलेली बॅग चोरी झाल्याबाबत

**(३९) २२९७५ (१०-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) शहरातून माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास १० लाख रुपयाने भरलेली बॅग चोरी झाली तसेच दिनांक ७ मे, २०१५ पंचायत समिती समोरील दुकानाकडे येत असतांना २.५० लाख रुपयाने भरलेली बॅग पळविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) होय,

दि.१०/४/२०१५ रोजी बॅंकेतून काढलेले रु. १० लाख चोरी प्रकरणी चोपडा शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४१/२०१५ भा.दं.वि. कलम ३९२, ३४ नुसार गुन्हा दाखल आहे. तसेच दि.६/५/२०१५ रोजी बॅंकेतून काढलेली रक्कम रु.२.५ लाख बळजबरीने हिसकावून नेले प्रकरणी चोपडा शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.५७/२०१५ भा.दं.वि. कलम ३९२, ३४ नुसार गुन्हा दाखल आहे.

(२) उक्त नमूद दोन्ही गुन्ह्यांत सराईत १ संशयीत व २ आरोपी निष्पन्न झाले असून ३ आरोपींना अटक करुन तपास करण्यात आला १ आरोपीकडून गु.र.नं. ५७/२०१५ या गुन्ह्यांतील रक्कमेपैकी १५०००/- रुपये हस्तगत करण्यात आले असून प्रकरणाचा तपास चालु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

### धर्मादाय आयुक्तालयांतील सुमारे ७०० पदे रिक्त असल्याबाबत

**(४०) २३११६ (१०-८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे सात ते साडेसात लाख विश्वस्त संस्था, संघटना कार्यरत असून या माध्यमातून कोट्यावधीची उलाढाल होत असते या सर्व कामांना नियंत्रित करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ व अत्याधुनिक यंत्रणा गरजेची असतानाही धर्मादाय आयुक्तालयांतील सुमारे ७०० पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१५मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, या धर्मादाय आयुक्तालयात सुविधा व इतर कामांसाठी पुरेसा निधी आणि प्रशासकीय मान्यता देण्याबाबत तसेच येथील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-९-२०१५) :** (१) हे. अंशत: खरे आहे.
(२) धर्मादाय आयुक्त कार्यालयात सुविधा व इतर कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध असून धर्मादाय आयुक्ताकडून कार्यालयांना सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यास प्रस्तावास मान्यता देण्यात येईल.

धर्मादाय आयुक्त यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील काही रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्यात आली आहेत. उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून सदर पदे भरण्यासाठी सेवा प्रवेश नियम व परिक्षा नियमावली मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु असून त्यास मान्यता घेवून रिक्त पदे तातडीने भरण्यात येणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील विविध भागात उड्डाणपुलांच्या व भुयारी मार्गाच्या कामात विलंब होत असल्याबाबत

**(४१) २३५६२ (११-०८-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील विविध भागात चालू असणाऱ्या ११ उड्डाणपुलांच्या व २ भुयारी मार्गाच्या कामांचे नियोजन करण्यासाठी आतापर्यन्त महानगरपालिकेने तज्ज्ञ सल्लागारांना दिले असल्याची बाब एप्रिल,२०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरातील अनेक कामांना कंत्राटदारांना कामातील विलंबामुळे वारंवार मुदतवाढ दिली जात आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा कंत्राटदारांवर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली व त्याचे स्वरुप काय,
(४) असल्यास, याप्रकरणी प्रशासनाकडून चौकशी करण्यात येणार काय, दोषी आढळणाऱ्या कंत्राटदारांस काळया यादीत टाकण्याचे निर्णय प्रशासनाकडून घेण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) होय.
पुणे शहरातील विविध भागात पुणे महानगरपालिकेतर्फे एकूण १० उड्डाणपूल व २ भुयारी मार्गाची कामे चालू आहेत. या कामांकरिता प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंसी अंतर्गत प्रकल्पनिहाय वेगवेगळया तज्ञ सल्लागारांची नेमणूक विहीत मान्यतेने करणेत आलेली आहे.
(२) नाही.

उड्डाणपूलाच्या कामामध्ये पूलाच्या आखणी अंतर्गत पूणे रस्तारुंदी क्षेत्र उपलब्ध नसणे, रस्त्यावर अतिक्रमणे असणे, पूलाच्या आखणीमध्ये येणारे व विद्युत पोल, झाडे, पाण्याच्या व ड्रेनेज लाईन हलविणे त्याचप्रमाणे पूलाचे काम चालू असताना वाहतुक पोलिसांची परवानगी घेणे, काम सुरु असताना टप्पेनिहाय वाहतुक डायव्हर्जन करुन काम करणे इत्यादी

विविध प्रकारच्या अडचणी त्या त्या उड्डाणपूलाच्या जागेवरील परिस्थितीनुसार असतात. सदर अडचणी दूर करणेसाठी संबंधितांशी समन्वय ठेवून सातत्याने प्रयत्न करणेत येत असतात.

ज्या ठिकाणी उपरोक्त कारणांमुळे उड्डाणपूलाच्या काम प्रशासकीय अडचणीमुळे हाती घेता येत नाही त्याच ठिकाणी कामास विलंब होत असतो. निविदा अटी व शर्तीनुसर ठेकेदाराची कामाची प्रगती संथ असल्यास ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करणेत येते. ज्या ठिकाणी प्रशासकीय अडचणींमुळे कामास विलंब होतो तेथे कामास मुदतवाढ द्यावी लागते, ही वस्तुस्थिती आहे.

(३) पुणे सातारा रस्त्यावर धनकवाडी उड्डाणपूलाच्या कामामध्ये ठेकेदार मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांनी कामाची प्रगती संथ ठेवल्याबद्दल रुपये २३.७८ लाख इतका दंड आकारणेत आला आहे. तसेच भाववाढ सुत्राचे इंडायसेस फ्रिज करणेची दंडात्मक कारवाई १ जानेवारी, २०१४ पासून केली आहे.

(४) ठेकेदारावर टेंडर व अटी शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करणेत आलली आहे. तसेच उड्डाणपूलाचे काम पूर्ण होवून वाहतुकीस खुला करणेत आल्याने ठेकेदारावर अन्य कारवाई करणेत आलेली नाही किंवा सुचविलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पी.एल.पी.एल.मधील गैरव्यवहार प्रकरणाला आळा घालण्याबाबत**

**(४२) २३५६८ (११-०८-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पी.एल.पी.एल. मधील गैरव्यवहार प्रकरणाला आळा घालण्यासाठी प्रशासनाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या प्रस्तावाला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून विरोध होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास अधिकाऱ्यांकडून विरोध करण्याची कारणे काय आहेत,

(३) सदरच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) नाही.

सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मुख्य कार्यालयात सीसीटीव्ही कार्यान्वित आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सध्या मुख्या कार्यालयात सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यात आलेला आहे. भविष्यात महामंडळाच्या सर्व मालमत्ताच्या जागी व बसेसमध्ये सीसीटीव्ही उभारणी करण्याची बाब पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील अतिक्रमणे, अनधिकृत पथारी व्यावसायिक, स्टॉल व खाद्यपदार्थांच्या हातगाडया यांच्यावर कारवाई होत नसल्याबाबत

**(४३) २४११७ (११-८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या मध्यम भागातील अतिक्रमणे, अनधिकृत पथारी व्यावसायिक, स्टॉल व खाद्यपदार्थांच्या हातगाडया यांच्यावर कारवाई होत नसल्यामुळे उपनगरांतही त्यांचे जाळे पसरले असून सातारा रस्ता, कोरेगाव पार्क, डीपी रस्ता औंध, सिंहगड रस्ता, बिबेवाडी मार्केट यार्ड या उपनगरातही अतिक्रमणे आणि अनधिकृत विक्रेते यांचा नागरिकांना उपद्रव्य होत असल्याची बाब माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विक्रेत्यांकडून अनधिकृतपणे वीज पुरवठा आणि घरगुती सिलेंडरचा वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) केंद्र शासनाच्या फेरीवाला अधिनियम, २०१५ या कायद्यांतर्गत फेरीवाल्यांचे बायोमॅट्रीक सर्व्हेक्षण केल्यानंतर संगणकीय नोंदणी करुन फेरीवाला प्रमाणपत्राचे वाटप होईपर्यत त्यांचेवर कारवाई करण्यात येऊ नये अशी तरतूद असल्यामुळे प्रश्नाधीन भागातील फेरीवाल्यांवर माहे मे, २०१५ पर्यत कारवाई करण्यात आली नव्हती. ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, दिनांक २५.५२०१५ ते १६.८.२०१५ या कालावधीत प्रश्नाधीन भागातील तसेच पुणे शहराच्या अन्य भागातील अनधिकृत पथारीवाल्यांवर तसेच मुख्य रस्त्यांच्यालगत असणा-या खाजगी इमारतींच्या फ्रंन्ट मार्जिनमधील खाद्यपदार्थ विक्रेते व इतर स्वरुपाची अतिक्रमणे हटविण्याची संयुक्त कारवाई मोहिम राबविण्यात येऊन यामध्ये स्टॉल, हातगाडी, पथारी, रोड इ. ठिकाणची एकूण ५७८५ अतिक्रमणे निष्कासित केली आहेत.

(२) काही अंशी सदरची बाब खरी आहे.

(३) अनाधिकृतपणे वीज पुरवठा घरगुती सिलेंडरचा वापर करणाऱ्या व्यवसायिकांवर संबंधित महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, पुर्ण तसेच अन्न आणि औषध प्रशासन विभाग, पूणे या कार्यालयाकडून कारवाई करण्यात येते. तसेच पुणे महानगरपालिकेकडून संबंधित विभागांना अशा व्यवसायिकांवर नियमानुसार कार्यवाही करण्याकरिता कळविण्यात आलेले आहे.

तसेच अशा प्रकारच्या अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांवर पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमणे निर्मुलन पथकाद्वारेदेखील वारंवार कार्यवाही करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही. तसेच पथकाद्वारे दैनंदिन कारवायामध्ये कारवाई करण्यात येते.

**लोकायुक्त व उपलोकायुक्त ही दोन्ही पदे रिक्त असल्याबाबत**

**(४४) २४५२० (१२-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गेल्या १६ महिन्यापासून रिक्त असलेली लोकायुक्त व उपलोकायुक्त ही दोन्ही महत्वाची पदे अद्याप भरलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास,सदर रिक्त पदे भरण्याचे दृष्टिने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१५) :** (१) लोक आयुक्त व उप लोक आयुक्त ही दोन्ही पदे रिक्त आहेत, हे खरे नाही, न्यायमुर्ती श्री. मदनलाल लक्ष्मणदास टहलियानी यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी लोक आयुक्त पदाचा कार्यभार ग्रहण केला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) लोक आयुक्त यांची नेमणूक करण्यात आली आहे, उप लोक आयुक्त यांची नेमणूक करण्यची बाब प्रगतीपथावर आहे.

---

**लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या कर सहाय्यक पदाच्या परिक्षेत बनावट प्रोफाईल बनविलेल्या अनेक उमेदवारांनी परिक्षा दिल्याबाबत**

**(४५) २४७९० (१२-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वर्ग दोनच्या विविध पदावरील अधिकारी निवडीसाठी घेतल्या जाणा-या लेखी व मौखिक परिक्षेसाठी उमेदवाराकडून बनावट प्रोफाईल बनविणा-या परिक्षार्थीचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दि. २२ फेब्रुवारी २०१५ रोजी झालेल्या कर सहाय्यक पदाच्या परिक्षेत बोगस प्रोफाईल बनविलेल्या अनेक उमेदवारांनी परिक्षा दिल्या असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, कर सहायक, गट-क पदावरील नियुक्तसाठी दिनांक २२ फेब्रुवारी,२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कर सहायक परीक्षा २०१४ करिता बनावट प्रोफाईलच्या आधारे एकूण ६ उमेदवारांनी परीक्षा दिली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे.

(३) दिनांक २२ फेब्रुवारी, २०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कर सहायक परीक्षा २०१४ परीक्षेला बसलेल्या ५६,३५२ उमेदवारांपैकी एकच आडनाव, प्रथम नांव व वडिलाचे नांव असलेले एकूण २५ उमेदवार असल्याचे आढळून आले, त्यानुसार तपासणी केल्यानंतर ६ उमेदवारांनी बनावट प्रोफाईलच्या आधारे आयोगास अर्ज सादर केल्याचे दिसून आले, बनावट प्रोफाइल बनविलेल्या ६ उमेदवारांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आली आहे, उमेदवारांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई महाराष्ट्र लोकसेवा आयोग करणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षेकरिता खुल्या प्रवर्गासाठी वयाचे निकष शिथिल करुन चाळीसाव्या वर्षापर्यंत परीक्षा देण्यास मान्यता मिळण्याबाबत**

**(४६) २५३८४ (१२-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.मोहन फड (पाथरी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लोकसेवा आयोगाच्या परिक्षेसाठी खुल्या गटाची वयोमर्यादा ३३ तर राखीव गटासाठीची वयोमर्यादा ३७ असून अन्य राज्यांमध्ये वयोमर्यादा ४० आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य लोकसेवा परिक्षेसाठी वयाचे निकष शिथिल करुन खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा चाळीसाव्या वर्षापर्यंत लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्यास मान्यता मिळावी अशा आशयाची मागणी अनेक संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) राज्यात लोकसेवा आयोगाच्या परिक्षेसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे इतकी असून राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरिता ३८ वर्ष इतकी कमाल वयोमर्यादा आहे, काही राज्यांमध्ये खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता ४० वर्ष इतकी कमाल वयोमर्यादा असल्याचे आढळून आले आहे,

(२) होय,

(३) व (४) संघटनेने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेली ३३ वर्षाची कमाल वर्यामर्यादा वाढविता येईल किंवा कसे ही बाब तपासण्यात येत आहे.

---

**वांद्रे (पूर्व) पश्चिम द्रुतगती मार्गावर खेरवाडी जंक्शन येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उड्डाण पूलाचे काम सुरु केल्याबाबत**

**(४७) २६१२२ (१०-०८-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) पश्चिम द्रुतगती मार्गावर खेरवाडी जंक्शन येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उड्डाणपूलाचे काम सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपूलाचे काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे,

(३) तसेच सदर उड्डाणपूलास मा. हिंदु हृदयसम्राट शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ४ नोव्हेंबर, २०१३ व त्यानंतर अनेक वेळा निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे वा कार्यवाहीची सद्यःस्थिती काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) व (२) होय. खेरवाडी जंक्शन येथील उड्डाणापुलाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्ण होऊन सदर उड्डाणपूल माहे एप्रिल, २०१५ मध्ये वाहतूकीस खुला करण्यात आला आहे.

(३) होय.

(४) सदर बाब तपासण्यात येत आहे.

---

**उमरगा (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथे न्यायालय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत**

**(४८) २६१५२ (०७-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथे न्यायालय इमारत बांधकाम करणे या कामास अर्थसंकल्प २०१५-१६ मध्ये समाविष्ट करण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१५) :** (१) होय,

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने, उमरगा, जि.उस्मानाबाद येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधकामाबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाकडून अद्यापर्यंत शासनास प्राप्त झालेला नसल्याची बाब मा.विधानसभा सदस्यांना कळविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर (नाशिक) येथील हुतात्मा स्मारकाची अत्यंत दुरावस्था झाल्याबाबत**

**(४९) २६७५७ (१२-०८-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (नाशिक) येथील हुतात्मा स्मारकाची अत्यंत दुरावस्था झाली असल्याचे माहे मार्च २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मारकांच्या देखभालीसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१५) :** (१) नाही, नगरपरिषद स्मारकाची दुरुस्ती केली असून सदरचे हुतात्मा स्मारक सुस्थितीत आहे.

(२) सदर स्मारक भारतीय माजी सैनिक, संघटना, सिन्नर (IESL) या संस्थेस देखभाल दुरुस्तीसह वापरण्यास दिले असून सदर संस्था देखभाल करीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील राज्यसेवा परिक्षेत उत्तीर्ण होऊनही अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवण्यात आल्याबाबत**

**(५०) २६७९५ (१०-१०-०१५६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या सन २०१४ च्या राज्यसेवा परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकडे वैधता प्रमाणपत्र असून देखील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आदिवासी कोळी समाज संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच विद्यार्थ्यांना न्याय मिळण्याच्यादृष्टीने शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, एक दिवसीय आदोलन केले.

(३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा परीक्षा-२०१४ नुसार निवडलेल्या व शिफारस करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या ४६ उमेदवारांपैकी २५ उमेदवारांचे दावे संशयास्पद असून त्यांचा पुनर्विचार/ पुनर्छाननी करणे आवश्यक असून त्यासाठी काही कालावधी लागेल, तोपर्यंत या उमेदवारांना निवड केलेल्या पदावर नियुक्त देण्यात येऊ नये,

असे आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी सामान्य प्रशासन विभागास कळविले होते. त्यानुसार या उमेदवारांना प्रशिक्षणास रुजु करुन घेण्यासाठी तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. प्रशिक्षणास रुजू करुन घेण्यासाठी दिलेल्या तात्पुरत्या स्थगितीविरोधात काही उमेदवांरानी मा.उच्च न्यायालयामध्ये याचीका दाखल केली. सदर प्रकरणी मा.न्यायालयामध्ये दिलेल्या निर्णयानुसार उमेदवांराना प्रशिक्षणास रुजू होण्यासाठी दिलेली स्थगिती उठविण्यात आली व त्यांना रुजू करुन घेण्यात आले आहे. उमेदवारांच्या जात प्रमाणपत्राच्या पडताळणीची कार्यवाही सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.